# घोगरे महाविद्यालयाचे वीस विद्यार्थी ‘सायबरयोद्धा’

## क्विक हिल फाउंडेशनकडून निवड; ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. ८ : सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत क्विक हिल फाउंडेशनतर्फे शहरातील डॉ. पा. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयातील २० विद्यार्थी-विद्यार्थिनींची सायबरयोद्धा म्हणून निवड करण्यात आली.

डॉ. पा. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय, क्विक हिल फाउंडेशन, पुणे व महाराष्ट्र सायबर विभाग, धुळे यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या करारांतर्गत पदवी व पदव्युत्तर वर्गातील संगणकशास्त्र विभागातील २० विद्यार्थी-विद्यार्थिनींची ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या उपक्रमांतर्गत ‘सायबरयोद्धा’ म्हणून निवड करण्यात आली. हे विद्यार्थी शाळा, महाविद्यालय तसेच नातेवाईक व समाजात सायबर जागरूकता अभियान राबवतील. निवडप्रक्रियेसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सीएसआर एक्झिक्युटिव्ह गायत्री पवार उपस्थित होत्या. त्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वेगवेगळ्या वयाच्या लोकांमध्ये त्यांच्या वयाचे होऊन कशा पद्धतीने सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून द्यायचे आहे. तसेच क्विक हिलच्या वेबसाइटवर महाराष्ट्र सायबरचे पेज आहे. त्यात वेगवेगळे सायबर फ्रॉड दिलेले आहेत. त्याचा अभ्यास जनमानसात जागृती निर्माण करण्यासाठी करा व देशाचे एक जबाबदार नागरिक




धुळे : सायबरयोद्धा म्हणून निवड झालेल्या डॉ. पा. रा. घोगरे महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसह मान्यवर.

बना, असे आवाहन पवार यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांनी महाराष्ट्राच्या ३० महाविद्यालयांची या उपक्रमात निवड झाली आहे. त्यात आपले महाविद्यालय आहे. त्यामुळे या संधीचा फायदा घेऊन धुळेकरांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करा, असे आवाहन निवड झालेल्या विद्यार्थ्यांना केले. प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. राकेश देवरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे तसेच संगणकशास्त्र विभागाच्या सहकारी प्राध्यापक तसेच विद्यार्थी जयेश गोरे, दिव्येश सोनवणे, पूर्वा पंचारिया, श्रेया विसपुते यांचे या कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, उपाध्यक्ष एस. टी. पाटील यांनी कौतुक केले आहे.